# मुंबई विद्यापीठ

**मुंबई विद्यापीठ अधिकारी/कर्मचा—यांकडून सातव्या वेतन आयोगाच्या अनुषंगाने विकल्पाचा नमुना व वचनपत्र भरुन घेण्याबाबत.**

क्र.मासंविक/आयसीसी/२०२०—२१/९२ , दिनांक १३ जानेवारी, २०२१.

**पाहा** :— शासन अधिसूचना, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र. वेतन—२०१९/प्र.क्र.२७८/१९/ विशि—१, दिनांक ०८ डिसेंबर, २०२० सोबतचे जोडपत्र— तीन व जोडपत्र— चार

वर **'पाहा'** येथे नमूद शासन अधिसूचनेद्वारे शासनाने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६, मधील कलम ८(३) येथील तरतुदीं अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन महाराष्ट्र शासन अकृषी विद्यापीठांमध्ये कार्य करणा—या शिक्षकेत्तर अधिकारी/कर्मचा—यांच्या वेतनश्रेणीत सुधारणा करण्यासाठी नियम विहीत केले आहेत. सदर नियमांना महाराष्ट्र अकृषी विद्यापीठे प्रमाणसंहित (शिक्षकेत्तर कर्मचा—यांचे सुधारित वेतन) नियम, २०२० असे संबोधून ते दिनांक १ जानेवारी, २०१६ पासून अनुज्ञेय करुन प्रत्यक्ष लाभ दिनांक ०१ नोव्हेंबर, २०२० पासून लागू केले आहेत. शासनाने दिनांक ०१ जानेवारी, २०१६ ते दिनांक ३१ ऑक्टोबर, २०२० या कालावधीची थकबाकी अनुज्ञेय राहणार नाही असेही स्पष्ट केले आहे. दिनांक ०८ डिसेंबर, २०२० च्या उक्त अधिसूचनेस व्यवस्थापन परिषदेने दिनांक ११ जानेवारी, २०२१ च्या बैठकीत ठराव क्र.३ अन्वये मान्यता दिलेली आहे.

मुंबई विद्यापीठात कार्यरत असणा—या अधिकारी/कर्मचारी यांची सातव्या वेतन आयोगानुसार वेतननिश्चिती करताना संबंधितांकडून शासन अधिसूचनेसोबत जोडण्यात आलेल्या जोडपत्र—तीन आणि जोडपत्र—चार, अनुक्रमे **विकल्पाचा नमुना** व **वचनपत्र** भरुन घेणे आवश्यक आहे. सदर जोडपत्र—तीन मधील विकल्पाचा नमुना तसेच जोडपत्र—चार मधील वचनपत्राचा नमुना या परिपत्रकासोबत जोडण्यात आलेले आहेत.

मुंबई विद्यापीठातील सर्व विभागप्रमुखांना सूचित करण्यात येते की, त्यांनी आपल्या अधिनस्त असणा—या सर्व अधिकारी/कर्मचा—यांकडून विहित नमुन्यातील विकल्प व वचनपत्र भरुन घेवून स्वत: साक्षांकित करुन या कार्यालयात दिनांक २२ जानेवारी, २०२१ पर्यंत न चूकता सादर करण्याची दक्षता घ्यावी. विकल्प अथवा वचनपत्र उपलब्ध न झाल्यामुळे वेतननिश्चितीस विलंब झाल्यास त्याबाबतची सर्व जबाबदारी संबंधित विभाग प्रमुखांची राहील याची कृपया नोंद घ्यावी.

प्रभारी कुलसचिव
मुंबई विद्यापीठ

मुंबई विद्यापीठातील सर्व विभागप्रमुख.

(शासन अधिसूचना उच्च व तंत्रशिक्षण विभाग, क्रमांक वेतन-२०१९/प्र.क्र.२७८/१९/विशि-१,
दिनांक- ८ डिसेंबर २०२० सोबतचे जोडपत्र)

## जोडपत्र-तीन

विकल्पाचा नमुना

[पहा नियम ६(१)]

१. (अ) कर्मचाऱ्याचे नांव श्री./श्रीम./कुमारी ..........................................

(ब) धारण केलेले पद .......................... कायम/स्थानापन्न

(क) विद्यमान वेतन संरचना: वेतनबँड पीबी...... रुपये...... ग्रेड. वेतन रुपये ......

(ड) सुधारित वेतन संरचना: वेतन स्तर एस** .......... रुपये.

(ई) कार्यालयाचे नांव ..........................................

२. मी * श्री/श्रीमती कुमारी ..........................................

(१) १ जानेवारी २०१६ पासून सुधारित वेतन संरचनेची निवड करतो/करते

(२) मी धारण करीत असलेल्या पदाची विद्यमान वेतनश्रेणी पुढीलप्रमाणे चालू ठेवण्याची निवड करतो/करते.

माझ्या पुढील वेतनवाढीच्या दिनांकापर्यंत..............

मी माझे वेतन रुपये.....पर्यत वाढवणा-या नंतरच्या वेतनवाढीच्या दिनांकापर्यंत.

मी पद रिक्त करेपर्यंत किंवा विद्यमान वेतनश्रेणी वेतन घेण्याचे बंद करेपर्यंत.

३. हा विकल्प अंतिम असून, त्यामध्ये या दिनांकानंतर सुधारणा करण्यात येणार नाही.

ठिकाण : सही

दिनांक : नांव ....................

(केवळ कार्यालयाने भरावयाचे)

प्रमाणित करण्यात येते की, * कायम/स्थानापन्न पद धारण करीत असलेल्या

श्री./श्रीम./कुमारी .......... यांनी हा विकल्प, यथोचितरित्या स्वाक्षरीसह व विहित दिनांकापूर्वी मला सादर केला आहे.

ठिकाण : सही

दिनांक : नाव :

कार्यालय प्रमुख ..........

* लागू नसेल ते खोडावे

** वेतन बँड क्रमांक नमूद करावा

*** वेतन स्तर क्रमांक नमूद करावा.

(शासन अधिसूचना, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्रमांक- वेतन-२०१९/प्र.क्र.२७८/१९/विशि-१, दिनांक- ०८/१२/२०२० सोबतचे जोडपत्र)

## जोडपत्र- चार

वचनपत्र

मी, .................................... असे वचन देतो/देते, की, महाराष्ट्र अकृषि विद्यापीठे प्रमाणसंहिता (शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे सुधारित वेतन) नियम, २०२० मधील तरतुदींशी विसंगत वेतननिश्चितीच्या परिणामी किंवा पुढे वेतननिश्चितीमध्ये विसंगती आढळून आल्यामुळे मला अतिप्रदान झाल्याचे निदर्शनास आल्यास ते भविष्यात मला प्रदान करण्यात येणाऱ्या रकमेतून समायोजित करुन किंवा इतर प्रकारे शासनास परत करीन.

ठिकाण :

दिनांक :

सही

नाव : ...............................

पदनाम : ..........................